
# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २०१२ वर्ष ५ अंक १ पृष्ठे ८ रु. २/-


## जिथे हे विभाजन होत असते तिथे भ्रष्टाचार असणारच

**आ**पण म्हणत होतो की अगदी प्रामाणिक असणे हे किती महत्त्वाचे आहे, एखाद्या कल्पनेशी किंवा एखाद्या वर्तनपद्धतीशी प्रामाणिक असणे नव्हे, तर तुम्ही जेव्हा वस्तुस्थितीला, ती जशी आहे तशी, पूर्णपणे सामोरे जाता तेव्हा असणारा प्रामाणिकपणा आणि एकात्मता. ही सचोटी आहे. ही एकात्मता आणि प्रामाणिकपणा अतिशय आवश्यक आहे कारण आपली वागणूक, आपले नैतिक आचरण, प्रेम, मृत्यू आणि आपण ज्याला ध्यान म्हणतो ती विलक्षण गोष्ट, या साऱ्यांबद्दल आपण अधिकाधिक गहन चिंतन करीत आहोत. कुठल्याही प्रकारच्या भ्रमाशिवाय, फसवणुकीशिवाय ह्या साऱ्या गोष्टींचा भेद घेण्यासाठी, 'जे आहे' ते बरोबर तसेच पाहण्यासाठी मनाची पूर्णपणे प्रामाणिक असण्याची कुवत असली पाहिजे.

भ्रष्टाचार ही आपली वर्तणूकपद्धती झाली आहे, जशी ती आज आहे. भ्रष्टाचार, हा शब्द मी अशा अर्थाने वापरतोय की, जेव्हा मन वेगवेगळ्या विभागांमध्ये कार्यरत असते, धार्मिक कृती, राजकीय कृती, कौटुंबिक कृती अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये खंडित असते किंवा व्यापारी, धार्मिक माणूस, कलाकार अशी निरनिराळी विभागणी असते; जिथे हे विभाजन होत असते तिथे भ्रष्टाचार असणारच. मी भ्रष्टाचार हा शब्दप्रयोग अगदी शब्दश: करीत आहे, म्हणजे तुकडे करणे, खंडन करणे आणि मन जेव्हा कृतीच्या अनेक वर्गांमध्ये, विचारांच्या, आदर्शांच्या वेगवेगळ्या शाखांमध्ये वावरत असते तेव्हा तिथे भ्रष्टाचार असणारच. जेव्हा मन एकात्म, संपूर्ण असते, विघटित नसते तेव्हाच भ्रष्टाचाराचा अंत होतो.

आम्ही काल दुपारी म्हणत नव्हतो का, की जग जे काही आहे तसे बघणे, जगाबद्दलची काही अवास्तव कल्पना नव्हे, तर आपले प्रत्यक्ष दैनंदिन जीवन, आपले रोजचे नातेसंबंध बघणे, खूप दु:ख आहे, विपन्नावस्था, गोंधळ आहे, क्वचितच काही आनंदाची स्फुरणे आणि सद्यस्थितीतील समाजाला सुधारणेची नितांत गरज आहे आणि... (पक्षाचे गाणे...) छान पक्षी आहे, तुम्ही साऱ्यांनी त्याचे गाणे ऐकले असेल अशी आशा आहे... आणि मी ज्या अर्थाने भ्रष्टाचार हा शब्द वापरीत आहे, त्या अर्थाने सुधारक स्वत:च जेव्हा भ्रष्ट असतो तेव्हा समाज भ्रष्टच असणार आणि आपले सांप्रत राजकीय जग, आर्थिक, सामाजिक, कलाजगत हे सारे भ्रष्ट आहे कारण ते माणसांची संपूर्ण घडण, त्याचा एकंदर स्वभाव, गुणधर्म विचारात घेत नाही. आणि आम्हाला संपूर्ण मानवी मनाची आस्था आहे, एखाद्याच विभागाची नव्हे. जर तुम्हाला एखाद्याच विभागाची चिंता असेल, मग तो काहीही असो, तर तिथे विभाजन, संघर्ष असणारच. आणि त्यातून खूप फसवणूक असते, जी जात्याच भ्रष्ट असते. बरोबर? परत एकदा, आम्हाला 'जे आहे' त्याची कळकळ आहे, जे असावे त्याची नाही, किंवा जे असू शकेल, किंवा 'जे आहे' त्याच्या परिवर्तनाबद्दल नव्हे, तर केवळ वस्तुस्थिती जशी आहे त्याबद्दलच आस्था आहे.

मद्रास १९७२, भाषण २

---

## तुम्हाला भ्रष्टाचार टिकलेला हवा आहे

**ह्या** काही समस्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य नाही. त्यासाठी खूपच कष्ट करायला हवेत आणि त्या स्वातंत्र्यातच तुम्हाला सत्य सापडेल. कुठल्याही राजकीय पद्धतीत ते सापडणार नाही. मग तो साम्यवाद, समाजवाद किंवा इतर काही असेल. राज्यव्यवस्था किंवा विज्ञान ह्या समस्या सोडवू शकणार नाहीत. तुम्ही चंद्रावर जा किंवा पृथ्वीतलावर रहा, माणसाचे मन तसेच आहे – वरवरच्या पातळीवर भ्रष्टाचार चालवून घेणारे, बदलण्याचा, सुधारण्याचा प्रयत्न करणारे. कुठलीही सामाजिक सुधारणा, कितीही नावाजलेली, कितीही कार्य करणारी असली तरी माणसाला स्वातंत्र्य देऊ शकणार नाही. प्रत्येक समाज सुधारणा ही माणसाच्या स्वातंत्र्याला नकार आहे. कारण ती समाजातील भ्रष्टाचाराला टिकवून धरते. कदाचित हे सर्व तुम्हाला माहीत असेल, कदाचित त्या सर्वाचा काही अंधुकसा विचारही केला असेल; आणि तुम्हाला त्यातून मार्ग सापडला नसेल.

म्हणून त्या गोंधळातून, त्या भ्रष्टाचारातून, ह्या निव्वळ सडण्यातून बाहेर पडण्याचा काही मार्ग आहे का हे आपण पाहणार आहोत. देव, धर्मगुरूसारखे बाह्य आधार आपण शोधले. पूजा, प्रार्थना, आज्ञापालन, संत महात्म्यांची पूजा, आंधळेपणाने किंवा जागरूकपणे त्यांचे अनुयायित्व पत्करणे अशा बाह्य मदतीचा आधार शोधणे शतकानुशतके चालत आले आहे. ह्या गोंधळापासून – जो माणसाने म्हणजेच तुम्ही आम्ही निर्माण केला आहे, जो आपल्याच कृत्यांचे फळ आहे त्यापासून – पळण्याच्या अनेक वाटा आपण शोधल्या आहेत.

समाज म्हणजे परस्पर संबंध, आपल्या एकमेकांशी असलेल्या संबंधांची निष्पत्ती. पर्यावरणाने आपल्याला घडवलंय आणि पर्यावरण आपण घडवतोय. हे सर्व पाहिल्यावर माणसाने काय करावे? तेथे पळवाट नाही. कुठलीही बाह्य व्यक्ती किंवा देव, कोणीही मंगळावरून किंवा

## संपादकीय

समाजात भडकलेला भ्रष्टाचाराचा वणवा पाहून आपण हतबुद्ध होत आहोत. अनेक प्रकारे, आपण – म्हणजे समाजच – तो वणवा थांबवण्याचा प्रयत्न करत आहोत. पण हे लक्षात येत नाही की हा भस्मासूर कुठे निर्माण झाला. आपण – आपल्याला सत्याची चाड आहे असे वाटणारे आपण – तळमळून हा वणवा कसा थोपवता येईल ह्याचा विचार करतो. तो विझवण्याचा प्रयत्न करतो. पण त्या वणव्याला इंधन आणि ठिणगी कुठून पुरवली जाते? आपण वरवरच्या ज्वालांवर पाण्याचे फवारे मारतो आहोत. जिथे ज्वालेचे मूळ आहे तिथे आपले लक्षदेखील गेलेले नाही.

भ्रष्टाचार हा अनादि कालापासून आहे. पण आज आधुनिक तंत्रज्ञान, माहिती प्रसारण ह्यांच्या दुरुपयोगातून त्याची घोडदौड कल्पनेबाहेर गेली आहे. सर्व आसमंत स्वार्थाच्या धुराने, धुळीने भरून गेले आहे. स्वच्छ, शांत विचार करण्याची कुवत हरवत चालली आहे.

या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी प्रयत्न करणारेही दिसतात. त्यांच्या प्रयत्नांनी त्यावर ताबा मिळेल असे भासते. पण तो भासच आहे. कायदे, चौकशा, शिक्षा, तुरुंगवास हे सर्व वरवरचे उपाय आहेत. त्यांनी निदान तात्पुरता उपायदेखील होऊ शकेल की नाही ह्याबद्दल शंकाच आहे.

मग पुढे काय? हताशपणे पाहत राहायचे का? कृष्णमूर्ती म्हणतात, ''त्याला उत्तर आहे. उत्तर बाहेर नाही, आत आहे. स्वार्थ हा भ्रष्टाचाराचे मूळ आहे. 'स्व' आहे म्हणून स्वार्थ आहे.'' मानवी मनामधील 'स्व' म्हणजे 'मी'. 'मी' हा एक आभास आहे. तो विचारांनी निर्माण केला आहे. आपल्या दैनंदिन जीवनात 'मी'चं स्थान सत्यापेक्षाही प्रबळ आहे. आपल्या जीवनाला आकार, चालना, ऊर्जा तोच देतो. अनादि कालापासून आत्मज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे, परंतु ते आत्मवाद, अनात्मवाद ह्या वादातच राहिले.

कृष्णमूर्ती '' 'मी' देखील एक विचार आहे'' असे म्हणतात, ते तर्कदृष्ट्या बुद्धीला पटते. 'मी' हा भ्रष्टाचाराचे मूळ आहे, हे देखील समजते. पण पुढे काय? ह्या प्रश्नाची बौद्धिक चर्चा करण्यापेक्षा त्रयस्ताच्या भूमिकेतून आपल्या हालचाली कोण दिग्दर्शित करते, कोण प्रक्षेपित करते, त्यात 'स्व' संबंधीचे किती विचार, किती रस आहे, ह्याकडे लक्ष गेले, हे वास्तव पाहिले गेले तरी एक प्रकारची नम्रता येईल व कदाचित आपल्या जबाबदारीची जाणीव होईल.

---

शुक्रावरून उडत्या तबकडीतून आपल्या मदतीला धावून येणार नाही. धर्म, श्रद्धा, धर्मावरील ठाम मते ह्या गोष्टी तुमचे मन, हृदय संपूर्ण शुद्ध करू शकणार नाहीत, ज्या योगे तुम्ही मुक्त व्हाल आणि तुम्हाला सुंदरता, असाधारण प्रेम आणि करुणा यांची जोड मिळेल.

मग आपण काय करू शकणार? सर्वप्रथम आपण समजतो तो धर्म वस्तुत: नाकारला पाहिजे, समाज जो आज आहे तो नाकारला पाहिजे, समाज म्हणजे मला म्हणायचे आहे समाजाची मानसिक घडण ज्याचे आपण अंश आहोत. आपण हे सर्व संपूर्ण नाकारले पाहिजे. तुम्ही मनाने, हृदयाने हा अधिकार पूर्णत: नाकारला पाहिजे. तुमच्या पलीकडील कुठल्याही बाह्य गोष्टीच्या मदतीची अपेक्षा तुम्ही कठोरपणे पूर्ण नाकारली पाहिजे. कृपा करून हे ऐका. आपण मदतीची अपेक्षा करतो कारण आपण त्रासात असतो. गोंधळात व संघर्षात असतो आणि आपल्याला मदत मिळायला हवी असते, आपल्याला काय करावे हे सांगणारे कोणी हवे असते, आपल्याला मार्गदर्शन हवे असते, ह्या अंधारात आपल्याला मदतीचा हात हवा असतो जो आपल्याला प्रकाशाकडे नेईल. आपण एवढे गोंधळलेले आहोत की कुठे वळायचे ते कळत नाही. शिक्षण, धर्म, नेते हे सगळे मार्गदर्शनात अयशस्वी झाले आहेत. तरीही आपण मदत शोधत राहतो. कारण आपण दु:खात, गोंधळात, संघर्षात आहोत; आणि कदाचित म्हणूनच तुमच्यापैकी बरेच जण कुठल्यातरी मार्गाने सत्याचे किरण दिसतील ह्या आशेने, कुठल्यातरी प्रकारे जीवनाच्या सौंदर्याप्रत मार्ग सापडेल ह्या आशेने इथे आला असाल.

आता जर तुम्ही अंत:श्रवणेंद्रियाने स्पष्टपणे ऐकाल तर तुम्हाला कळेल की इथे मदत नाही आहे. वक्ता तुम्हाला मदत करू शकणार नाही. तो मदत करणे नाकारतो. कृपा करून समजून घ्या. सावकाश चला. तो पूर्णत:, समग्रपणे मदत करणे नाकारतो आहे.

तुम्हाला भ्रष्टाचार टिकलेला हवा आहे. भ्रष्टाचारात जगणे हवे आहे आणि त्या भ्रष्टाचारात सुखसोयीने जगण्यासाठी, आपल्या महत्त्वाकांक्षा पुढे नेण्यासाठी, आपले मार्ग, आपले हेवेदावे, दुष्टपणा, पुढे नेण्यासाठी मदत व्हायला हवी; आपले रोजचे जीवन तसेच चालू ठेवून तरीही थोडीशी सुधारणा व्हावी, थोडीशी अधिक श्रीमंती मिळावी, थोडा अधिक आराम मिळावा, थोडीशी खुशी मिळावी ह्यासाठी तुम्हाला मदत हवी. हेच तुम्हाला हवे – अधिक चांगला व्यवसाय, अधिक चांगली गाडी, अधिक चांगले स्थान. दु:खापासून संपूर्ण मुक्ती तुम्हाला नको आहे. प्रेम म्हणजे काय, त्याचे सौंदर्य काय, त्याची भव्यता काय हे तुम्हाला जाणून घ्यायचे नाही. निर्मिती म्हणजे काय हे तुम्हाला शोधायचे नाही.

तुम्हाला खरोखर हवे आहे ते हे, की या त्रस्त जगात तुमच्या जीवनातील कुरूपता, अस्तित्वातील क्रौर्य, रोजचा संघर्ष हे सुधारित रूपात चालू ठेवण्याला तुम्हाला मदत व्हावी. हेच तुम्हाला माहित आहे; तुम्ही त्यालाच चिकटून आहात आणि त्यातच तुम्हाला सुधारणा हवी आणि जो तुम्हाला त्याच क्षेत्रात राहायला मदत करतो तो तुम्हाला महान वाटतो, तो संत वाटतो, तो उत्कृष्ट प्रेषित वाटतो.

म्हणून वक्ता म्हणतो की तो तुम्हाला मदत करणार नाही. तुम्ही त्याच्याकडून मदतीची अपेक्षा करत असलात तर तुम्ही चुकलात. कुणाकडूनही कुठल्याही प्रकारे मदत होत नसते; ही स्वत: समजून घेण्याची घाबरवून सोडणारी गोष्ट आहे. माणूस म्हणून संपूर्ण स्वत:च्या पायावर उभे राहायला हवे हे भयानक सत्य समजून घ्यायला हवे. नाही उपनिषद, नाही गीता, नाही कोणी नेता तुम्हाला सावरू शकणार. तुम्ही स्वत:च तुम्हाला सांभाळले पाहिजे. तुम्हाला माहित आहे का, की ह्या वास्तवाचे तुम्हाला आकलन होईल तेव्हा ते काय करेल? ते वास्तव आहे. जेव्हा ह्याचा तुम्हाला बोध होईल तेव्हा एकतर तुम्ही भ्रष्टाचारात बुडून जाल किंवा तेच वास्तव समाजाच्या मानसिक रचनेच्या जाळ्याला तोडून बाहेर पडायला, सगळ्याचा भंग करायला प्रचंड ऊर्जा देईल. मग तुम्हाला कधीच मदत मागावी लागणार नाही कारण तुम्ही मुक्त असाल.

मुक्त माणूस जो घाबरत नाही, ज्याला स्पष्ट मन आहे, ज्याची बुद्धी तरल, प्रबळ, ऊर्जायुक्त आहे त्याला मदतीची जरूरी नाही.

आपल्याला, तुम्हाला, मला संपूर्ण एकटे एकाकी कुणाच्याही मदतीशिवाय उभे राहायला हवे. तुम्ही राजकीय मदतीची अपेक्षा केली, गुरूकडून धार्मिक मदत मागितली, सामाजिक मदत सगळीकडे शोधली. त्या सगळ्यांनी तुम्हाला फसवले. राजकीय, आर्थिक, साम्यवादी, सामाजिक क्रांत्या झाल्या, पण ते सारे ह्याला उत्तर नाही. ते तुम्हाला मदत करू शकणार नाहीत. ते अधिक जुलूम व गुलामगिरी आणतील.

मुंबई १९६४, भाषण ७

---

## कोणाचेही अनुसरण करणे म्हणजे सर्वात मोठी भ्रष्टता आहे

**तर** मग मन वस्तुस्थितीचे निरीक्षण करू शकेल का? वस्तुस्थिती म्हणजे 'जे आहे', तुमची हिंसा, आक्रमकता, तुमची अधिकार, सामर्थ्याची आस, यश, सुरक्षिततेची इच्छा, तेच 'जे आहे' ते. विचारांच्या काहीही हालचालीविना तुम्ही हे पाहू शकाल का? विचार, जो वास्तवापासूनच्या वेगवेगळ्या रूपांमधील पळवाटा स्वीकारण्यामध्ये संस्कारित असतो आणि त्यामुळे तुम्ही शक्ती वाया घालवीत असता. मला काय म्हणायचे आहे ते मी स्पष्ट करतो आहे का? कारण जर तसे नसेल तर तुम्हाला स्पष्टपणे कळेपर्यंत मी पुन्हा पुन्हा हे समजावून सांगेन. कारण, कृपा करून हे पाहा, मी तुमचा गुरू नाही, तुम्ही माझे शिष्य नाहीत – नशीब, मी तुम्हाला शिष्य म्हणवणार नाही! तुम्ही मूर्ख किंवा विचित्र आहात म्हणून नव्हे, तर कोणाचेही अनुसरण करणे म्हणजे सर्वात मोठी भ्रष्टता आहे. त्यात प्रेम नसते, त्यात विलगता असते, संघर्ष, अमानुषता असते. विचार आणि कृती यांची अधिकारपरंपरा आहे. याउलट आम्ही या साऱ्या गोष्टींबद्दल एकत्र विचार करण्याचा प्रयत्न करीत आहोत, गंभीरपणे एकत्र विचार करण्याचा, या एकत्र जगण्याच्या अतिशय जटील प्रश्नाचा उलगडा करण्याचा, कारण आपण एकत्रपणे जगातील ही विपन्नावस्था निर्माण केली आहे, आणि आपल्याला एकत्रच ती निस्तरायची आहे. तुम्ही एकट्याने नव्हे किंवा मी एकट्याने नव्हे, आपल्याला हे एकत्रपणे करायचे आहे आणि तुम्ही जर तुमच्या निरीक्षणामध्ये स्पष्ट, तर्कशुद्ध आणि शहाणे नसाल तर ते शक्य नाही. म्हणून तुम्ही स्वत:च स्वत:चे शिक्षक असायला पाहिजे, स्वत:चेच शिष्य, म्हणून तुम्ही कोणाचेही अनुसरण करायचे नाही. मग तो सारा भार तुमचाच आहे आणि तुमची तो भार वाहायची इच्छा नसेल. तुम्ही ते वाहण्यासाठी तयार असाल वा नसाल, ते ओझे तुमचेच आहे, त्यापासून तुम्ही अंग काढू शकत नाही, त्यापासून पळण्याचा तुम्ही प्रयत्न करू शकत नाही, ते तुमचेच ओझे आहे आणि जगातील कोणीही व्यक्ती, हा वक्ता धरून, विशेषत: हा वक्ता, तुमचा हा भार हलका करू शकत नाही. तुम्हाला स्वत:च त्या ओझ्याकडे पाहायचे आहे, त्याचे निरीक्षण करायचे आहे, त्याचे मनापासून जतन करायचे आहे, ते समजून घेणे पूर्णपणे अंगिकारले पाहिजे.

तेव्हा मन हे शक्ती वाया घालविण्यामध्ये संस्कारबद्ध असल्यामुळे जी वस्तुस्थिती, 'जे आहे' त्याला सामोरे जाण्यास असमर्थ आहे. 'जे आहे' त्या वास्तवाला भिडण्यासाठी तुम्हाला प्रचंड शक्तीची गरज आहे. ही प्रचंड उर्जाच 'जे आहे' त्या पलीकडे जाते किंवा त्याचा उलगडा करते.

मद्रास १९७२, भाषण २

## भ्रष्टाचाराची सुरुवात कुठे होते?

**म्हणून** आपण प्रश्न विचारायला हवा की जगामध्ये एवढा भ्रष्टाचार का आहे? मला माहित आहे की हा विषय जरा गुंतागुंतीचा आहे. जगामध्ये एवढा भ्रष्टाचार का आहे? भ्रष्टाचार म्हणजे काय? तो शब्द, त्या शब्दाचा मूळ अर्थ, लॅटिन, ग्रीक आणि इटालियन प्रमाणे... त्याचा अर्थ आहे तोडणे. मी त्या साऱ्यात खोल जाणार नाही. भ्रष्टाचाराचे मूळ काय आहे? भ्रष्टाचाराची सुरुवात कुठे होते? टेबलाखालून पैसे देणे, तो भ्रष्टाचार आहे का? बड्या माणसाला भेटण्यासाठी शिपायाला पैसे देणे? भ्रष्टाचार म्हणजे काय, जो इतका प्रचलित आहे, विशेषत: या देशामध्ये अधिक. तुमच्या मित्रासाठी, तुमच्या पुतण्यासाठी, तुमच्या मुलांसाठी वशिला लावणे, त्याला भ्रष्टाचार, म्हणायचे का? कृपया, या विषयी विचार करा, त्याकडे पाहा. निश्चितच ते एक फार फार वरवरच्या भ्रष्टाचाराचे रूप आहे. परंतु तिथे एक खूप सखोल असे कारण आहे, अगदी गहन कारण हा भयानक भ्रष्टाचार, जो सर्वत्र चालला आहे. तुम्ही एका नेत्याचे अनुसरण करता तेव्हा भ्रष्टाचार होतो का? पुढे चला, मित्रांनो, या प्रश्नाचे उत्तर द्या. ज्यावेळी तुम्ही तुमच्या गुरूचे अनुसरण करता तेव्हा भ्रष्टाचार नसतो का? सत्याच्या नावाखाली अशा अनेक गोष्टीच्या निमित्ताने, जेव्हा तुम्ही कोणाचे तरी अनुसरण करता तेव्हा, किंवा तुम्ही कुठच्या तरी आदर्शाच्या मागे जाता तेव्हा तो सुद्धा भ्रष्टाचार नव्हे का? या प्रश्नामुळे तुम्ही आश्चर्यचकित झालात का? किंवा तुम्हाला ते सर्व काही माहित आहे. या साऱ्याचे कारण काय आहे त्याचा आपण एकत्र शोध घेत आहोत. जेव्हा आपल्यापैकी प्रत्येक जण महत्त्वाकांक्षी असतो तेव्हा भ्रष्टाचार नसतो का? मत्सरी असतो तेव्हा? जेव्हा प्रत्येकजण स्वत:च्याच भल्याचा विचार करीत असतो तेव्हा, जेव्हा त्याला आपलाच हेका खरा करायचा असतो, जेव्हा माणसे एखाद्या गोष्टीविषयी एक विशिष्ट भूमिका घेतात तेव्हा – तुम्हाला हे सगळं समजतंय का? मी कशावर तरी विश्वास ठेवतो, आणि तुम्ही त्याविषयी एक भूमिका घेता तेव्हा? दुसरा म्हणतो, ''मी सुद्धा अगदी विरुद्ध गोष्टीवर विश्वास ठेवतो'', बरोबर? तो सुद्धा भ्रष्टाचार नसतो का? तुम्ही पाहा, तुम्ही नाही समजू शकत... म्हणून, जेव्हा प्रत्येक जण स्वत:साठीच बघत असतो तेव्हा भ्रष्टाचाराची सुरुवात होत नसते का? परंतु जेव्हा भ्रामक समजुतीशी मी खोलवर जखडलेला असतो तेव्हासुद्धा, आदर्शवादी, काल्पनिक श्रद्धा कवटाळून असतो तेव्हा नाही का भ्रष्टाचार! ही भ्रष्टाचाराची सुरुवात नसते का? कॅथॉलिक कोणत्यातरी गोष्टीवर प्रगाढ विश्वास ठेवतात, बरोबर? कुठच्या तरी संकल्पनेवर, कोणावर तरी विश्वास, कुठची तरी श्रद्धा आणि तुम्ही दुसऱ्या कुठच्या तरी श्रद्धेवर भूमिका घेता, कशावर तरी विश्वास ठेवता, कुठच्या तरी देवावर आणि तुम्ही दोघे लढायला तयार होता – प्रत्यक्ष लढाई नाही – परंतु तुम्ही त्या मूर्खपणामध्ये स्वत:ला निराळे करता, जणू काही तुमचा मूर्खपणा हा पूर्णपणे निराळा असतो. हे सर्व तुमच्या लक्षात येत नाही का? भ्रष्टाचाराची सुरुवात तेथे होत नाही का? जेथे मूलत: सूक्ष्मपणे स्वत:चा स्वार्थ असतो तेथे भ्रष्टाचाराची सुरुवात होत नाही का?

राजघाट – वाराणसी, १९८४ भाषण १

# वृ | त्त | वि | शे | ष

## कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया - वार्षिक संमेलन २०११






कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे दरवर्षीप्रमाणे यावर्षी वार्षिक संमेलन दि. १९ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०११ दरम्यान सह्याद्री स्कूल येथे भरले होते. जवळजवळ २०० जीवन साधक या संमेलनामध्ये सहभागी झाले होते.

संमेलनाचा विषय होता *Integrity & Fragmentation in our Lives (आपल्या जीवनातील समग्रता आणि विभक्तता).* दैनंदिन जीवनाची जगण्याची कंटाळवाणी चौकट काही काळ बाजूला ठेवून सह्याद्री स्कूलच्या निसर्गरम्य वातावरणात कृष्णजींच्या शिकवणुकीविषयी अधिक काही जाणून घेण्यासाठी सगळे जण उत्सुकतेने या संमेलनात सामील झाले होते.

संमेलनाची सुरुवात दि. २० रोजी सकाळी ८ वा. ४५ मि. नी स्तोत्र पठणाने झाली. हे पठण चारही दिवस सकाळी याच वेळी चालत असे. पहिल्या दिवशी दि. २० ला सकाळी ९ वा. प्रा. पी. कृष्णा यांचे *Wholeness of Life* (जीवनाची समग्रता) या विषयावर चिंतनपर भाषण झाले. कृष्णजींच्या शिकवणुकीच्या अनुषंगाने त्यांनी समग्र जीवन जगणे म्हणजे काय यावर विवेचन केले आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. आणि संध्याकाळी ६ वा. *The Vitality of the Free Mind* या विषयावर कृष्णजींच्या भाषणाची डिव्हिडी दाखविण्यात आली.

दुसऱ्या दिवशी स. ९ वा. प्रा. जी. गौतम यांचे *The Roots of Fragmentation* (विभाजनाचे मूळ कारण) या विषयावर भाषण झाले. या विषयावर बोलताना त्यांनी दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणे घेऊन हा विषय समजावून सांगण्याचा प्रयत्न केला व त्यानंतर अनेक श्रोत्यानी उत्स्फूर्तपणे प्रश्नोत्तरांमध्ये भाग घेतला. संध्या. ६ वा. *What can We Do in this World?* या विषयावर कृष्णजींच्या भाषणाची व्हिडिओ दाखविण्यात आला.

पहिले दोन दिवस दु. ११ ते १२-३० या दरम्यान गटचर्चा झाल्या. संमेलनामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाला कृष्णजींच्या शिकवणुकीविषयी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळण्याच्या हेतूने या गटचर्चा आयोजित केल्या जातात आणि सर्वजण या चर्चेमध्ये उत्स्फूर्ततेने सहभागी होतात.

तिसऱ्या व चौथ्या दिवशी *Panel Discussions* झाली. पहिल्या पॅनेल चर्चेचा विषय होता. *On Corrupt Society, Mind & Brain* आणि दुसऱ्या पॅनेल चर्चेचा विषय होता *What is Our Responsibility?* या दोन्ही पॅनेलमध्ये चर्चा चांगल्याच रंगल्या व त्यानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांमध्ये बऱ्याच श्रोत्यांनी भाग घेतला आणि चर्चा पुढे नेली.

तिसऱ्या दिवशी दि. २२ रोजी सं. ६-१५ वा. श्री. संजीव अभ्यंकर यांच्या रागदारी तसेच अभंग गायनाचा श्रोत्यांनी मनमुराद आनंद घेतला. रागदारी गाणे समजावे म्हणून त्यांनी मधूनच त्याविषयी अत्यंत सोप्या भाषेत विवेचन केले. त्यांचे गायन फारच रंगले आणि श्रोत्यांनी त्यांना मनसोक्त दाद दिली.

शेवटच्या दिवशी स. ११ वा. फाउंडेशनचे सेक्रेटरी श्री. एस. पी. कंदास्वामी यांचे या संमेलनाच्या समारोपाचे भाषण झाले. या भाषणामधून श्री. कंदास्वामी यांनी अत्यंत तळमळीने कृष्णजींच्या शिकवणुकीचा आढावा घेत ही शिकवण जबाबदारीने सर्वांनी पुढे न्यायची आहे याची जाणीव करून दिली. अतिशय वेधकपणे फाउंडेशन करीत असलेल्या कार्याचा परामर्श घेत आणि अनेक पौराणिक कथांचा आधार घेत त्यांनी श्रोत्यांच्या हृदयाला स्पर्श केला. त्यांच्या या भाषणामधून कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीसंबंधी त्यांची तळमळ शब्दाशब्दामधून व्यक्त होत होती. या समर्पक भाषणाने चार दिवस चाललेल्या संमेलनाचा समारोप झाला. या संमेलनातील सर्व व्यवस्था अगदी काटेकोरपणे चोख ठेवली गेली होती. तसेच नाश्ता-जेवणामधील वैविध्यतेने या संमेलनात अधिक रंगत आणली. एकूण सर्व संमेलनार्थी या संमेलनामधून आनंद घेऊन परत आपापल्या दैनंदिन जीवनाला सामोरे जाण्यासाठी परत गेले.

---

**बदलापूर:** बदलापूरच्या कृष्णमूर्ती सेंटरमध्ये डॉ. परचुरेंबरोबर आठ दिवसांचे शिबीर झाले त्याचा हा आढावा. शिबिराला मुख्यत: परदेशातून आलेले पाहुणे होते. ह्या शिबिरामध्ये नवीन अभ्यासकांना कृष्णमूर्तींच्या शिकवणीचा पाया समजायला मदत झाली असे वाटते. त्याचप्रमाणे अनेक वर्षे अभ्यास करणाऱ्यांना आपली समज कुठेतरी अडकून राहते – ती का अडकते, हे पाहण्यास मदत झाली असे म्हणता येईल.

सर्व मानवजातीची जाणीव (Consciousness)एक आहे. पण मानवी इतिहासात एका टप्प्यावर एक वेगळे वळण घेतले गेले व माणसाच्या जाणीवेत मी व तू असे विभाजन झाले. हे विभाजन समाजातील संघर्षाचे कारण आहे हे कृष्णमूर्तींचे म्हणणे स्पष्ट केले गेले. आपल्या मनात सतत विचार असतात, हे विचारच भ्रमाचे कारण आहे. हे विचार सातत्याची भावना निर्माण करतात व रिक्त जागा भरून काढतात. आपल्याला विचार दिसतो पण रिक्त जागा दिसत नाही. जेव्हा 'मी' हा विचार नसेल तेव्हा ती जागा दिसेल. हे सर्व शब्दापलीकडचे आहे. आपण हे शब्दाशिवाय बघू शकलो तर ते दुसऱ्यापर्यंत शब्दाशिवाय कसे पोहोचेल, हे समजून घेण्याचा प्रयत्न झाला. या शिबिरात सहभाग घेतलेल्या सर्वांनी शिबिराच्या व्यवस्थापनेस हातभार लावला आणि अत्यंत खेळीमेळीने शिबीर पार पडले.

**भोपाळ:** सानेन येथील ८ जुलै १९७९ रोजी झालेल्या कृष्णमूर्तींच्या भाषणाची डिव्हिडी स्वामी विवेकानंद वाचनालय, जीटीबी कॉम्प्लेक्स, भोपाळ येथे ११ डिसेंबर २०११ रोजी दाखविण्यात आली. हा कार्यक्रम मध्यप्रदेश शासनाच्या शिक्षण विभागातर्फे आयोजित केला होता. कार्यक्रमासाठी आलेले बहुसंख्य श्रोते पहिल्या प्रथमच कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीशी परिचित होत होते. कृष्णमूर्ती फाउंडेशनने कृष्णजींची बरीचशी पुस्तके तसेच ऑडिआ, व्हिडिओ डिव्हिडीज् या वाचनालयाला भेट म्हणून दिली आहेत. कृष्णजींची पुस्तके आणि टेप्स या कार्यक्रमामध्ये आवर्जून प्रदर्शित करण्यात आली होती. हे वाचनालय भोपाळ शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून त्याचा वाचकवर्ग फार मोठा आहे आणि म्हणून कृष्णमूर्तींची शिकवण अधिकाधिक लोकांपर्यंत पोचेल, अशी अपेक्षा आहे.

**इंदोर:** श्री. समीर गोळवेलकर यांनी इंदोरमध्ये कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र स्थापन केले आहे. आता कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीमध्ये ज्यांना रस आहे असे अभ्यासक येथे एकत्र येऊ शकतील. येथे डिसेंबर २०११ मध्ये अनेक अनौपचारिक आणि अभ्यासपूर्ण परिसंवाद झाले. या केंद्रामध्ये कृष्णजींची पुस्तके आणि ऑडिओ, व्हिडिओ डिव्हिडीज् यांचे संकलन आहे. तसेच फाउंडेशनची प्रकाशने वाचकांना उपलब्ध आहेत आणि काही पुस्तके विक्रीसाठी सुद्धा ठेवण्यात आली आहेत.

**इंदोर केंद्राचा पत्ता:**
कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, द्वारा ऑपशन्स,
१६०, एफ. बी. सेक्टर एफ. स्कीम ९४, पिपलीया हनाजवळ, इंदोर,
दूरध्वनी: ०७३१ ४०४८३७४.
संपर्क: श्री. समीर गोळवेलकर, भ्रमणध्वनी: ९३०३०१४१२१

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.• ईमेल: thestudykfi@yahoo.com • वेबसाईट: www.kfionline.org
कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बंगलोर येथील अध्ययन कार्यशाळा:**
२५-२९ जानेवारी २०१२ Silence, Stillness, Meditation
०९-१२ फेब्रुवारी, २०१२ Ending of Conflict
०८-११ मार्च, २०१२ Freedom, Responsibility & Discipline
०७-१० एप्रिल, २०१२ *Karnataka gathering: What is a Religious Mind?
संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस,१७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बंगलोर-५६००६२.
दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी :** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०४५३ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र,ऋषी व्हॅली,** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २६०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल: study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी,** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१. • ईमेल: krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९०• वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता,** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल: kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक - ओरिसा,** पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल: kficuttackcentre@sify.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर :**
१२ फेब्रुवारी, २०१२ - वार्षिक संमेलन
आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र,
दूरध्वनी: ०८००७४३९७०२, (०२२) २५०१४०९४, २४२२३१९९ • ई मेल: zilog@vsnl.com

## स्वार्थापासून भ्रष्टाचाराची सुरुवात होत असते

*कृष्णमूर्ती:* तुमच्याप्रमाणेच, मानवामध्ये क्षमता असतात. एक प्रकारच्या सुप्त कला विद्या दडलेल्या असतात. कला-विद्या, समजलात का? म्हणजेच चित्रे काढण्याची कला, व्हायोलिन वाजविण्याची, बासरी वाजविण्याची कला किंवा एक अगदी चांगला माणूस असणे. तुम्हा सर्व माणसांना अशा सुप्त कला अवगत असतात. बरोबर? आणि तुमचा समाज, तुमचे पालक, प्रत्येकजण म्हणतो उद्योजक बना, डॉक्टर बना किंवा इंजिनिअर बना किंवा शासनाच्या सेवेमध्ये आय.ए.एस. व्हा. म्हणून तुमचा मेंदू, समजतंय ना, जो या डोक्यामध्ये बसला आहे. हा तुमच्या पालकांकडून, ज्या समाजामध्ये तुम्ही राहता त्या समाजाकडून संस्कारित केला गेला आहे. तुम्हाला समजतंय ना?

*विद्यार्थी:* होय, सर

*कृष्णमूर्ती:* तेव्हा तुमची स्वत:ची बुद्धी या दबावामुळे नष्ट होत असते. तुम्ही थोर चित्रकार असाल, बरोबर? किंवा मोठे गायक किंवा एक विलक्षण वनस्पतीशास्त्रज्ञ किंवा शेतीतज्ञ. बरोबर? परंतु तुमचे पालक, तुमचा समाज म्हणतो, 'नाही, ते पुरेसे नाही. तुम्ही खरा चांगला धंदा केला पाहिजे किंवा चांगला डॉक्टर किंवा आय.ए.एस. अधिकारी बनले पाहिजे'. त्यासाठी तुम्ही स्वत:चे उपजत कौशल्य नष्ट करता. म्हणून तुमची स्वत:ची बुद्धी, कला जोपासणे हे फार महत्त्वाचे आहे. मग त्या कलेसह तुम्ही आनंदी जीवन जगता. मी काय म्हणतो आहे ते तुम्हाला समजतंय ना?

तेव्हा तुमची कला, विद्या काय आहे ते शोधून काढणे फार कठीण काम असते आणि ते तुम्हाला यशाप्रत घेऊन जाईलच असे नाही आणि ते काही महत्त्वाचे नसते. समजलं ना? मग फार पैसे मिळाले नाहीत तरी तुमची हरकत नसते. कारण तुमच्यामध्ये जे आहे त्याचा तुम्हाला शोध लागलेला असतो.

*विद्यार्थी:* होय, सर

*कृष्णमूर्ती:* तेव्हा तुम्ही सर्वजण ते शोधून काढा. तुमची स्वत:मधली कला शोधून काढा. तुमचं स्वत:चं असं काहीतरी शोधून काढा, शिक्षणाने लादलेली विद्या किंवा कला नव्हे किंवा तुमच्या पालकांनी किंवा समाजाने ठरविलेली नव्हे, तर तुमच्या स्वत:साठी तुमच्यामध्ये काय आहे ते शोधून काढा.

*विद्यार्थी:* परंतु जर आमचे पालक आमच्यावर जबरदस्ती करत असतील तर –

*कृष्णमूर्ती:* मला माहीत आहे तुमचे पालक तुम्हाला इंजिनिअर बनण्यासाठी दबाव आणतात. तुम्ही कोणीतरी बनले पाहिजे म्हणून जबरदस्ती करतात. परंतु ज्यावेळी तुम्ही युवक असता तेव्हा स्वीकारा ते आव्हान आणि तुमच्या स्वत:साठी ते शोधून काढा.

*विद्यार्थी:* परंतु समजा तुम्हाला काहीतरी झालं तर –

*कृष्णमूर्ती:* मला माहीत आहे. मी काय म्हणतो आहे ते परत ऐका. कारण मला अजून काहीतरी सांगायचं आहे. बरोबर?

*विद्यार्थी:* ठीक आहे.

*कृष्णमूर्ती:* तुम्हाला काही हरकत नाही?

*विद्यार्थी:* नाही, सर

*कृष्णमूर्ती:* आणि तुम्ही सुद्धा ही विलक्षण सुंदर ऋषी व्हॅली सोडल्यानंतर बाहेरच्या या जगात प्रवेश करणार आहात. हे विशाल खडक, हे वृक्ष आणि त्यांच्या छाया, ही फुले आणि खरोखर शांत असा हा परिसर सोडून तुम्ही एका भयानक जगाला सामोरे जाणार आहात. जिथे हिंसा आहे. बळजबरी आहे, हाणामारी आहे, भ्रष्टाचार आहे. जग अधिकाधिक धोकादायक बनत चाललं आहे. बरोबर? आणि जग भ्रष्ट होत चाललं आहे. संपूर्ण जगभरात, फक्त भारतात नव्हे, तिथे हे सर्व अगदी उघडपणे घडत आहे. तुम्हाला या शब्दाचा अर्थ माहीत आहे ना? अगदी उघडपणे. ते म्हणतात, मी तुमचं काही काम करण्यासाठी तुम्ही मला काहीतरी दिलं पाहिजे. तिथे भ्रष्टाचार असतो, बरोबर? सर्व जगभर. फक्त इथे या भारतातच नाही तर अमेरिकेमध्ये, फ्रान्समध्ये, इंग्लंडमध्ये – राजकीय भ्रष्टाचार, सामाजिक भ्रष्टाचार, काळाबाजार, वगैरे वगैरे. सबंध जगभर हा भयानक भ्रष्टाचार चालू आहे. आपण म्हणतो भ्रष्टाचार म्हणजे लाच देणे, टेबलाखालून पैसे देणे, हिशोब दिल्याशिवाय रोकडे पैसे खर्च करणे. या सर्वाला भ्रष्टाचार म्हणतात. बरोबर? परंतु ती फक्त लक्षणे असतात. लक्षण म्हणजे काय ते तुम्हाला माहीत आहे का?

*विद्यार्थी:* होय सर, चिन्ह, संकेत.

*कृष्णमूर्ती:* लक्षण म्हणजे काय ते तुम्हाला माहीत आहे का? लक्षण म्हणजे मी काहीतरी खाल्लेलं असतं, फार जड अन्न आणि मला पोटदुखी सुरू होते. पोटदुखी हे लक्षण झालं. परंतु याचं कारण मी चुकीचं अन्न खाल्लं हे आहे. समजलं का?

*विद्यार्थी:* होय, सर

*कृष्णमूर्ती:* तेव्हा, मला भ्रष्टाचाराच्या कारणामध्ये शिरायचं आहे. आपण भ्रष्टाचार म्हणतो – तुम्ही सर्व ऐकत आहात अशी मी आशा करतो. कारण तुम्ही ज्यावेळी ऋषी व्हॅली सोडून जाल तेव्हा या जगाला सामोरे जायचं आहे.

*विद्यार्थी:* सर, समजा, तो देत असलेले पैसे तुम्ही घेतले नाहीत तर तो आणखी काहीतरी वाईट करेल, जर तुम्ही पैसे घेतले....

*कृष्णमूर्ती:* जर मी तुम्हाला टेबलाखालून पैसे दिले तर मी भ्रष्ट होतो.

*विद्यार्थी:* होय, सर

*कृष्णमूर्ती:* आणि मग, तुम्हीसुद्धा भ्रष्ट होता कारण तुम्ही पैसे स्वीकारत असता, बरोबर?

*विद्यार्थी:* होय सर, परंतु मी जर पैसे घेतले नाहीत तर तो दुसरंच काहीतरी करेल.

*कृष्णमूर्ती:* मला माहीत आहे. मी जाणतो ते. जर तुम्ही पैसे घेतले नाहीत तर तो तुम्हाला मारहाण करील. जरा ऐका, समजून घ्या. भ्रष्टाचाराचं कारण काय आहे? तुम्हाला समजतंय का? भ्रष्टाचार म्हणजे पैसे टेबलाखालून देणं एवढंच नाही. पैसे देणं, काळाबाजार. परंतु त्याचं कारण पूर्णपणे काहीतरी निराळंच आहे, बरोबर? जर तुम्हाला त्यात रस असेल तर त्याविषयी मी बोलणार आहे. भ्रष्टाचाराची सुरुवात स्वार्थापासून, स्वहिताच्या आवडीतून होत असते. तुम्हाला कळतंय ना?

*विद्यार्थी:* होय, सर.

*कृष्णमूर्ती:* जर मला माझ्यामध्येच रस असेल, मला जे काय पाहिजे त्यामध्येच, मी जे काय असलो पाहिजे त्यामध्ये, जर मी लोभी असलो तर, द्वेषी, कठोर, अमानुष, क्रूर, तर मग तिथे भ्रष्टाचार असतो. तुम्हाला समजतंय ना? भ्रष्टाचार तुमच्या हृदयात सुरू होतो, तुमच्या मनामध्ये. फक्त पैसे देण्यापासून नव्हे – तो सुद्धा भ्रष्टाचारच आहे. परंतु भ्रष्टाचाराचं खरं कारण तुमच्या आतच आहे. तुम्ही ते शोधून काढल्याशिवाय आणि ते बदलल्याशिवाय तुम्ही भ्रष्ट मनुष्यच राहणार. मी जे काय म्हणतोय ते समजतंय ना? जेव्हा तुम्हाला राग येतो तेव्हा तेथे भ्रष्टाचारच असतो, जेव्हा तुम्ही मत्सरी असता, जेव्हा तुम्ही लोकांचा द्वेष करता, जेव्हा तुम्ही आळशी असता, जेव्हा तुम्ही म्हणता 'हे बरोबर आहे' आणि मी म्हणतो ते मला बरोबर वाटतं आणि त्यालाच मी चिकटून बसतो तेव्हा तिथे भ्रष्टाचार असतो. तुम्हाला कळतंय ना मी काय म्हणतो आहे ते?

*विद्यार्थी:* सर, असं वाटतंय की प्रत्येक गोष्ट स्वार्थीपणाची दिसतेय.

*कृष्णमूर्ती:* प्रत्येक गोष्ट स्वार्थीपणात मोडते. तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे. भ्रष्टाचाराची तेथेच सुरुवात होते. मुला, समजलं का ?

*विद्यार्थी:* होय.

*कृष्णमूर्ती:* तेव्हा भ्रष्टाचारी होऊ नका, जरी तुम्हाला तुमचे प्राण द्यावे लागले तरी हरकत नाही.

*विद्यार्थी:* सर...

*कृष्णमूर्ती:* थांबा, जरा माझं ऐका. समजलं का? आपण सारे इतके भयभीत झालेलो आहोत. तुम्ही म्हणाल की, मग मी कसं जगावं ? माझ्या सभोवती असलेले सर्व लोक जर भ्रष्टाचारी असतील आणि मी जर भ्रष्टाचारी नसेन तर मी काय करावं? भ्रष्टाचार म्हणजे मला काय म्हणायचं आहे ते तुम्हाला समजतंय ना. फक्त बाहेरचं वरवरचं लक्षण नव्हे, तर खोलवर आत दडलेली भ्रष्टाचाराची भावना, ज्या बरोबर आज सर्व माणसं जशी जगताहेत ती – स्वार्थी, फक्त त्यांचाच विचार करणारी, त्यांच्याच यशामागे धावणारी, द्वेषी – तुम्हाला समजतंय ना? तेव्हा भ्रष्टाचार तुमच्या आत आहे, तुमच्या हृदयात आहे, तुमच्या मेंदूमध्ये आहे आणि म्हणून तुम्हाला जर ते काळजीपूर्वक समजलं, आणि तुम्ही जर खरोखरच गंभीर असाल आणि नकारात्मक नसाल; प्रौढ झालेली बरीचशी मुलं जी आता शाळा सोडून जाणार आहेत ती नकारात्मक झाली आहेत. जग जसं आज आहे तसं ते

पाहत आहेत. ते म्हणतात, मला ते स्वीकारावंच लागेल. ती एक प्रकारची नकारात्मकताच आहे. परंतु तुम्ही जर हे सर्व आत्तापासूनच काळजीपूर्वक समजून घेतलं की भ्रष्टाचार म्हणजे केवळ टेबलाखालून पैसे देणे नव्हे, पैसे देणे म्हणजे ते दोन रुपये असोत किंवा दशलक्ष डॉलर्स असोत तो भ्रष्टाचारच असतो. आणि हिंसक असणं हा सुद्धा ज्याला भ्रष्टाचार म्हणतात त्याचाच प्रकार आहे, दहशतवाद आणि तसंच सर्व काही. जगात जे काही चाललंय ते हेच आहे. तुम्ही आता वयाने मोठे होत चालला आहात. त्यांच्यासारखे तुम्ही होऊ नका. रागीट होऊ नका, द्वेषी – मत्सरी होऊ नका. यशाच्या मागे नेहमी धावू नका.

*विद्यार्थीः* सर, आम्ही हे सर्व कसं थांबवू शकतो ? मत्सर, द्वेष आम्ही कसा थांबवू शकतो?

*कृष्णमूर्तीः* जर तुम्हाला मत्सरी व्हायचं असेल तर मत्सरी व्हा आणि काय होते ते पाहा, तुम्हाला समजतंय ना? परंतु तुम्हाला जर मत्सरी व्हायचं नसेल तर मत्सर करू नका. असं म्हणू नका की, मी ते कसं थांबवू? जर तुम्ही विषारी, धोकादायक साप पाहिलात, तर तुम्हाला कोणी सांगत नाही. तुम्ही धावत सुटता. बरोबर? तेव्हा आतला – मनातला – भ्रष्टाचार सर्वात जास्त धोकादायक असतो. बरोबर? म्हणून भ्रष्टाचारी होऊ नका. येथून सुरुवात करा. बाहेर तिकडे नाही, तुम्हाला कळतंय ना? तुम्ही हे कराल का? तुम्ही कराल याची तुम्हाला निश्चित खात्री असल्याशिवाय तुम्ही कधीही वचन देऊ नका. बरोबर? परंतु जर तुम्ही पाहाल की आयुष्यात ते किती महत्त्वाचं असतं ते, कारण तुम्ही सगळे आता प्रौढ होत आहात, या भयानक जगामध्ये मोठे होत आहात, या भ्रष्ट, वेड्या जगामध्ये. तुम्हाला समजतंय ना? राजकीय जगामध्ये, धार्मिक जगामध्ये, शहाणपणा नाही आहे, आर्थिक जगामध्ये सूज्ञपणा नाही. बरोबर?

तेव्हा कृपा करून, मी फक्त तुम्हाला दाखवून देत आहे. तुम्ही मग प्रौढ झालेले असाल किंवा ही सुंदर ऋषी व्हॅली सोडून जाणार असाल किंवा इथे आणखीन दोन–चार वर्षे राहणार असाल. परंतु भ्रष्टाचारी होऊ नका, अंतर्यामी अभिमान, गर्वाच्या मागे लागू नका. असं म्हणू नका की मी कोणापेक्षा तरी अधिक वरचढ आहे. तुम्हाला माहित आहे की जेव्हा विनयशीलता असते तेव्हा तुम्ही खूप काही शिकता. तुम्हाला विनयशीलता हा शब्द माहित आहे ना? जर तुम्ही खरंच विनम्र असाल तर तुम्ही बरंच शिकता. परंतु जर तुम्ही केवळ यश, पैसा, पैसा आणि पैशाच्याच मागे लागलात, सत्ता, प्रतिष्ठा, स्थान यांच्या मागे लागलात, समजलं ना, तर मग तुम्ही भ्रष्टाचाराबरोबर सुरुवात करता. तुम्ही गरीब असाल तर तुम्ही गरीब राहा. कोण पर्वा करतोय? म्हणूनच तर हे तुमच्यासाठी खूप महत्त्वाचं आहे, तुम्हा सर्वांसाठी, तुमची स्वत:ची कला – आवड – शोधून काढा आणि त्यालाच धरून राहा. मग त्याने तुम्हाला यश, प्रसिद्धी मिळवून दिली नाही तरी हरकत नाही. ते सगळं अखेर निरर्थक आहे. कारण आपण सगळे शेवटी मरण पावणार आहोत. तुम्हाला माहित आहे का मुलांनो? तर जेव्हा तुम्ही जगता आहात तेव्हा जगा मग, जो काही वेडेपणा, घाणेरडेपणा, या जगात चालू आहे त्याच्याबरोबर नका जगू.

*विद्यार्थी :* सर, लोकांना हे का समजत नाही?

*कृष्णमूर्तीः* कारण ते विचार करीत नाही, त्यांना ते जाणवत नाही, ते नेहमी स्वत:बद्दलच विचार करीत असतात. त्यांची नोकरी, त्यांचे व्यवस्थापन, त्यांचं काम, तुम्हाला समजतंय का? त्यांना याच्यामध्ये रस नाही. परंतु जर तुम्हाला रस असेल तर ...

ऋषी व्हॅली शाळेमधील विद्यार्थ्यांसोबत तिसरा संवाद
२० डिसेंबर, १९८४

## तुलना - अनुकरण मन भ्रष्ट करते

आम्ही अनेक वेळा ह्या पत्रांमधून दाखवून दिल्याप्रमाणे, ह्या शाळा प्रामुख्याने मानवामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणण्यासाठी अस्तित्वात आहेत. शिक्षक ह्याला संपूर्णपणे जबाबदार आहे. शिक्षकाला ह्या मध्यवर्ती घटकाचे अवधान नसेल तर तो विद्यार्थ्याला फक्त एखादा व्यावसायिक, एखादा इंजिनिअर, वकील किंवा राजकारणी होण्यासाठीच शिकवेल. ह्यापैकी बरेच जण स्वत:मध्ये किंवा त्यांच्या समाजामध्ये परिवर्तन आणण्याला असमर्थ असल्याचे दिसते. कदाचित सद्य समाजरचनेत वकील आणि व्यावसायिक यांची आवश्यकता असेल. परंतु ह्या शाळा जेव्हा अस्तित्वात आल्या तेव्हा मानवतेत मूलभूत परिवर्तन आणण्याचा उद्देश होता आणि आज देखील आहे. ह्या शाळेतील शिक्षकांना हे खरोखर समजले पाहिजे – बौद्धिक किंवा काल्पनिक स्तरावर नव्हे – तर त्यांच्या संपूर्ण अस्तित्वासह त्यांनी त्याचा गर्भितार्थ पाहिल्यामुळे समजले पाहिजे. आम्हाला चिंता आहे ती मानवाच्या संपूर्ण विकासाची, फक्त त्याने ज्ञान गोळा करण्याबद्दल नाही.

कल्पना आणि आदर्श ही एक बाजू, आणि वास्तव, प्रत्यक्ष घडणे ही दुसरी. ते दोन्ही कधीही एकत्र येऊ शकत नाहीत. आदर्श हे सत्यावर लादले जातात, आणि मग जे असायला पाहिजे अशी अपेक्षा असते, त्या आदर्शाशी जुळवून घेण्यासाठी, जे प्रत्यक्ष घडत आहे ते सत्य पिरगळले जाते. आदर्श जग हे सभोवतालच्या घडामोडीतून काढलेल्या निष्कर्षाचे फलित असते, आणि मान्यताप्राप्त आदर्श अनुसरण्यासाठी तिथे वस्तुस्थितीचा त्याग केला जातो. हजारो वर्षे ही प्रक्रिया घडत आली आहे; आणि प्रत्येक विद्यार्थी आणि सर्व विद्वान ह्या कल्पनातरंगात रंगून जातात. वास्तव टाळणे ही मन भ्रष्ट होण्याची सुरुवात आहे. सारे धर्म, राजकारण, शिक्षण, माणसाचे सारे परस्परसंबंध ह्या साऱ्यांमध्ये भ्रष्टाचार शिरून पसरला आहे. टाळण्याची ही प्रक्रिया समजणे आणि त्या पलीकडे जाणे ह्याची आम्हाला कळकळ आहे.

आदर्श हे मन भ्रष्ट करतात; आदर्शांचा उगम हा कल्पना, निष्कर्ष, आशा यामध्ये असतो. कल्पना ह्या 'जे आहे' त्याचे कल्पित रूपांतर असते. 'जे घडत आहे' त्याबद्दल कल्पना करणे, निष्कर्ष काढणे, ह्या गोष्टी 'जे घडत आहे' ते विकृत करतात आणि मग भ्रष्टाचार येतो. ते सत्यापासून, 'जे आहे' त्यापासून लक्ष दुसरीकडे नेतात आणि कल्पनारम्य गोष्टींकडे लक्ष वळवितात. सत्यापासून दूर नेणारी ही गती प्रतिके, प्रतिमा निर्माण करते, जी मग सर्वव्यापी महत्त्व धारण करतात. सत्यापासून दूर नेणारी ही वाटचाल म्हणजे मनाची भ्रष्टता आहे. मनुष्यप्राणी आपल्या संभाषणात, परस्परसंबंधात आणि तो करीत असलेल्या जवळ जवळ सर्व कृतीत ह्या सत्यापासून दूर जाणाऱ्या गतीत रमत असतो. सत्य हे एका क्षणात एखादी कल्पना किंवा निष्कर्षांमध्ये रूपांतरित केले जाते, आणि त्या कल्पना किंवा निष्कर्ष मग आपल्या प्रतिक्रियांची दिशा ठरवितात. एखादी गोष्ट पाहिली की विचार लगेच त्याचे प्रतिरूप निर्माण करतो आणि तेच मग सत्य ठरते. तुम्ही कुत्रा पाहता, आणि क्षणार्धात तुमच्या मनात कुत्र्याबद्दलची एखादी प्रतिमा असेल तिच्याकडे विचार वळतो आणि म्हणून तुम्ही कुत्रा कधीही पाहत नाही.

विद्यार्थ्यांना आता घडत असलेल्या वास्तवाबरोबर – मग ते

मानसिक असो की बाह्य असो – त्या वास्तवाबरोबर राहायला शिकवता येईल का? ज्ञान हे सत्य नव्हे, ते सत्यासंबंधी आहे आणि त्याला देखील त्याची योग्य जागा आहे. परंतु ज्ञान हे वास्तव काय आहे, ते समजण्याच्या आड येते. मग भ्रष्टाचार सुरू होतो. हे समजणे खरोखर फार महत्त्वाचे आहे. आदर्श हे महान समजले जातात, उदात्त आणि महत्त्वाचा थोर हेतू असलेले समजले जातात आणि जे वास्तवात घडत असते ते केवळ ऐहिक, भोग्य व कमी लेखले जाते. जगभरातल्या शाळांना काहीतरी महान प्रयोजने आणि आदर्श असतात, म्हणूनच ते विद्यार्थ्यांना भ्रष्टाचाराचे प्रशिक्षण देत असतात.

मनाला काय भ्रष्ट बनविते? आम्ही मन हा शब्द वापरतोय ज्यामध्ये ज्ञानेंद्रिये, विचारशक्ती तसेच स्मृती आणि अनुभव यांना ज्ञानरूपाने साठविणारा मेंदू हे समाविष्ट आहेत. हा संपूर्ण ओघ म्हणजे मन. सबोध तसेच अबोध जाणीव आणि तथाकथित अलौकिक जाणीव, हे सर्व म्हणजे मन. आमचा प्रश्न आहे की ह्या सर्वांमध्ये भ्रष्टाचाराचे बीज, भ्रष्टाचाराचे घटक कुठले आहेत? आम्ही म्हणालो की आदर्श भ्रष्ट करतात, ज्ञानदेखील मन भ्रष्ट करते. विशिष्ट ज्ञान किंवा विस्तृत ज्ञान ही भूतकाळाची करणी आहे आणि भूतकाळ जेव्हा प्रत्यक्षाला आपल्या छायेने झाकोळून टाकतो तेव्हा भ्रष्टाचार सुरू होतो. ज्ञान जेव्हा भविष्याचे प्रक्षेपण करते आणि आता घडत असलेल्या वर्तमानावर पकड घेते तेव्हा भ्रष्टाचार घडत असतो. आम्ही 'भ्रष्टाचार' *(Corruption)* हा शब्द, जे खंडित केले जात आहे ते, जे संपूर्ण आहे असे मानता येत नाही ते, ह्या अर्थाने वापरत आहोत. सत्याचे तुकडे करता येत नाहीत, सत्य हे केव्हाही ज्ञानाने मर्यादित असू शकत नाही. सत्याची परिपूर्णता अनंताचा दरवाजा उघडते. परिपूर्णतेचे विभाजन होऊ शकत नाही. ते स्वत:शी विसंगत नसते, ते स्वत:चे विभाजन करू शकत नाही. अखंडता, परिपूर्णता हा अनंत गतीवेध आहे.

अनुकरण, अनुसरण, अनुवर्तन ही मनाच्या भ्रष्टाचाराची मोठी कारणे आहेत. उदाहरणार्थ – नायक, गुरू, तारणहार – हा भ्रष्टाचाराचा सर्वाधिक नाशकारी घटक आहे. अनुयायी होणे, आज्ञापालन करणे, जुळवून घेणे म्हणजे स्वातंत्र्याला नकार देणे. स्वातंत्र्य हे सुरुवातीपासून असते, शेवटी नव्हे. असे नाही की आधी जुळवून घ्या, अनुकरण करा, स्वीकारा आणि मग कालांतराने स्वातंत्र्य सापडेल. त्यात अधिकारशाहीची भावना आहे; त्यात हुकूमशहाची, अधिकारशाहीची, गुरूची, पुजाऱ्याची निर्दयता, क्रौर्य आहे.

म्हणून अधिकार हा भ्रष्टाचार आहे. अधिकार हा एकात्मता, अखंडता, पूर्णता भग्न करतो, मग तो अधिकार शाळेतील शिक्षकाचा असेल किंवा संस्थेचा, उद्देशाचा किंवा आदर्शाचा असेल, किंवा 'मी जाणतो' असे म्हणणाऱ्याचा असेल. कुठल्याही स्वरूपातील अधिकाराचे दडपण हा भ्रष्टाचाराचा विकृतीकरणाचा घटक आहे. अधिकार हा मूलत: स्वातंत्र्य नाकारतो. अधिकाराचा भ्रष्ट प्रभाव पाडल्याशिवाय सूचना देणे, मुद्दा दाखवून देणे, माहिती देणे हे खऱ्या शिक्षकाचे कार्य आहे.

तुलनेची हुकमत विनाश करते. जेव्हा एका विद्यार्थ्याची तुलना दुसऱ्या विद्यार्थ्याबरोबर केली जाते तेव्हा दोघेही दुखावले जात असतात. तुलनेशिवाय जगणे म्हणजे एकात्मता असते. तुम्ही, एक शिक्षक, हे करणार का?

*The Whole Movement of Life is Learning*
*J. Krishnamurti's letters to his schools*
प्र. ११, फेब्रुवारी १९७९

कृष्णमूर्तीविषयीच्या काही वेबसाईटस्:
www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

*Published in January, May, September*

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*



जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क :-** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४०० ००६.दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

Periodical

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*